| CNR : MHPU140008392025 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल तारीख | : | १५.०४.२०२५ |
| | नोंदणी तारीख | : | २९.०४.२०२५ |
| | निकाल दिनांक | : | २८.०७.२०२६ |
| | कालावधी | : | वर्ष ०१ महिना ०० दिवस १३ |

**प्रभारी विशेष न्यायाधीश (विशेष न्यायालय, न्यायालय क्र.३), बारामती, जि.पुणे यांचे न्यायालयात**

(न्यायाधीश– श्री. हितेंद्र उर्मिला अनिलकुमार वाणी)

**विशेष खटला क्र. ६१/२०२५** **निशाणी क्र. ४२**

**भाग 'अ'**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (I))**

| | |
|---|---|
| गु.र.क्र. २११/२०२४, भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ७४, ७८, ६४, ३५२, ३५१(२), ११५(२) तसेच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा, १९८९ कलम ३(२)(w)(i)(ii) व ३(२)(va) अन्वये<br>**पोलीस ठाणे – माळेगाव** | |
| **फिर्यादी** | महाराष्ट्र सरकारतर्फे माळेगाव पोलीस ठाणे, जि.पुणे. |
| **प्रतिनिधीत्व** | श्रीमती. एस. बी. ओहोळ, अति.सरकारी अभियोक्ता, बारामती. |
| **आरोपी** | **विशाल उर्फ पोपट धनसिंग खामगळ**<br>वय : २५ वर्षे, व्यवसाय : मजुरी,<br>रा. खामगळवाडी, ता. बारामती, जि.पुणे. |
| **प्रतिनिधीत्व** | श्री. ए.पी. चौगुले, वकील, आरोपीकरीता. |

**भाग 'ब'**
**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | दि.१४/०७/२०२४ ते दि.२५/०८/२०२४ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | ०१/०९/२०२४ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | २९/०४/२०२४ |
| आरोपीविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख | ०३/१०/२०२५ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | ०६/०६/२०२६ |
| निकालाची आरक्षीत तारीख | -- |
| निकालाची तारीख | २८/०७/२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | -- |

## आरोपीचा तपशील

| आरोपी चा क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनावर सोडणल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौप्रसं कलम ४२८ करिता संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विशाल उर्फ पोपट खामगळ | १५.०३.२०२४ | जेलमध्ये | भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ७४, ७८, ६४, ३५२, ३५१(२), | दोषमुक्त केले. | -- | १ वर्ष ४ महिने १३ दिवस |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ११५(२) तसेच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा, १९८९ कलम ३(२)(w)(i)(ii) व ३(२)(va) अन्वये | | | |

**भाग 'क'**
**( फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii) )**
**सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

## अ. सरकारी साक्षीदार,

| **क्रमांक** | **नांव** | **निशाणी क्र.** | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| १ | पिडीता | २५ | तक्रारदार/फिर्यादी |
| २ | पिडीतेचे पती | २९ | पिडीतेचे पती |

## ब. बचावाचे साक्षीदार,

| **क्रमांक** | नांव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्ष्झीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## क. न्यायालयीन साक्षीदार

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणंची यादी

## अ. सरकारी

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | २६ | तक्रार/फिर्याद |
| २ | २७ | छापील फिर्याद |
| ३ | २८ | पिडीतेचा भा.ना.सु.सं.१८३ प्रमाणे नोंदविलेला जबाब |
| ४ | ३० | घटनास्थळ पंचनामा दि.०१.०९.२०२४-बचावपक्षातर्फे मान्य करण्यात आला |
| ५ | ३१ | घटनास्थळ पंचनामा दि.०३.०९.२०२४-बचावपक्षातर्फे मान्य करण्यात आला |
| ६ | ३२ | नारायण विठ्ठल काकडे यांचा जातीचा दाखला-बचावपक्षातर्फे मान्य करण्यात आला |
| ७ | ३३ | पिडीतेचे वैद्यकिय प्रमाणपत्र - बचावपक्षातर्फे मान्य करण्यात आला |
| ८ | ३४ | आरोपीचा अटक पंचनामा - बचावपक्षातर्फे मान्य करण्यात आला |
| ९ | ३५ | आरोपीचे वैद्यकिय प्रमाणपत्र - बचावपक्षातर्फे मान्य करण्यात आले |
| १० | ३६ | जप्ती पंचनामा - बचावपक्षातर्फे मान्य करण्यात आला |
| ११ | ३७ | मुद्देमाल पावती - बचावपक्षातर्फे मान्य करण्यात आली |
| १२ | ३८ | खामगळवाडी येथील गट क्र.७२ चा ७/१२ उतारा - बचावपक्षातर्फे मान्य करण्यात आला |
| १३ | ३९ | नाहरकत दाखला - बचावपक्षातर्फे मान्य करण्यात आला |

ब. बचाव

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

क. न्यायालयीन निशाण्या

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| --- | --- | --- |

ड. भौतिक वस्तु

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| --- | --- | --- |

## न्यायनिर्णय

## (पारित दिनांक २८ जुलै, २०२६)

१. आरोपी हा भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ७४, ७८, ६४, ३५२, ३५१(२), ११५(२) तसेच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा, १९८९ कलम ३(२)(w)(i)(ii) व ३(२)(va) अन्वये आरोपावरील संपरिक्षेस सामोरे जात आहे.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन येणेप्रमाणे,**

२. दि.१४.०७.२०२४ ते २५.०८.२०२४ दरम्यान फिर्यादी व तिचे पती आरोपीकडे कामास होते. दि.२२.०७.२०२४ रोजी आरोपीने फिर्यादीस फोन करुन तिचे पती त्याचेकडे कामास का आले नाही याबाबत विचारणा केली. त्यानंतर आरोपीने फिर्यादीस वारंवार फोन करुन 'तु मला खुप आवडती माझे सोबत रिलेशनमध्ये रहा' असे म्हणाला. फियादीने आरोपीस नकार दिल्याने

आरोपीने फिर्यादीस तिचे मुलांना व नव-याला मारण्याची धमकी दिली. त्यामुळे सदरची बाब फिर्यादीने तिचे पतीस सांगितली नाही. दि.२५.०८.२०२४ रोजी आरोपीने फिर्यादीस तिच्या जवळ ओढले व तिच्या नावाने एक फेक अकाउंट काढले असल्याचे व तिने नकार दिल्यास त्या अकाउंटवर त्याने तिचे अंघोळ करत असतानाचे काढलेले फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने सदर बाब तिचे पतीस सांगितली व आरोपी विरुध्द दि.३१.०८.२०२४ रोजी माळेगाव पोलिस ठाणे येथे फिर्याद दाखल केली.

३. उपरोक्त नमूद फिर्यादीवरुन माळेगाव पोलीस ठाणे यांनी अपराध क्र.२११/२०२४ अन्वये आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला. गुन्ह्याच्या तपासादरम्यान तपासी अधिकारी यांनी घटनास्थळी जावून घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे जबाब नोंदवले व आरोपीस अटक केली. तसेच त्यांनी पिडीतेची व आरोपीची वैदयकिय तपासणी करवून घेवून सदर वैद्यकिय तपासणीबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त केले. तपासाअंती आरोपीने पिडीतेला आपखुशीने दुखापत पोहचवून तिचेवर बलात्कार केल्याचे व तिचा विनयभंग केल्याचे निष्पन्न झाले. सबब आरोपी विरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने माळेगाव पोलिस ठाण्याचे ठाणे अंमलदार यांनी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयामध्ये सादर केले.

४. माझे पूर्व पिठासिन अधिकारी यांनी आरोपी विरुध्द नि.क्र.६ अन्वये आरोप निश्चित केले व ते आरोपीस त्याच्या भाषेत समजावून सांगितले. आरोपीने गुन्हा नाकबुल केला व संपरीक्षेस समर्थता दर्शविली. साक्षीदारांच्या उलतपासावरुन व आरोपीच्या भा.न्या.सु.सं. चे कलम ३५१ अन्वये नोंदविलेल्या जबाबावरुन आरोपीचा बचाव संपूर्ण नकारार्थी स्वरुपाचा असल्याचे दिसून येते.

५. खालील मुद्दे या खटल्याच्या न्यायनिर्णयार्थ माझ्या समक्ष उपस्थित होतात. त्यांना मी खालीलप्रमाणे माझे निष्कर्ष नोंदवून त्याची कारणमिमांसा सादर करतो.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीने पिडीतेचा विनयभंग करण्याचे दृष्टीने फौजदारी बलप्रयोग केला ? | नाही. |
| २. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, पिडीतेने आरोपीशी संबंध ठेवण्याची इच्छा नसल्याचे प्रदर्शित केल्यानंतर देखील आरोपीने पिडीतेस फोन व मेसेज करुन तिच्याशी वैयक्तिक संपर्क केला ? | नाही. |
| ३. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीने पिडीतेवर बलात्कार केला ? | नाही. |
| ४. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, पिडीतेला शिवीगाळ केल्याने ती प्रक्षोभित होईल अथवा ते सार्वजनिक शांततेचा भंग करेल अथवा दुसरा गुन्हा करेल याची जाणीव असूनही आरोपीने पिडीतेला शिवीगाळ केली अथवा तिचा अपमान केला ? | नाही. |
| ५. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीने पिडीतेला भयभीत करण्याकरीता तीला धमकी देवून फौजदारीपात्र धाकदपटशा केला ? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| ६. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीने फिर्यादीस इच्छापुर्वक दुखापत केली ? | नाही. |
| ७. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपी हा अनुसुचित जाती अथवा अनुसुचित जमातीचा सदस्य नसताना व पिडीता ही अनुसुचित जातीची सदस्य आहे हे माहित असताना देखील आरोपीने पिडीतेला तिचे परवानगीविना जाणीवपूर्वक लैंगिक स्वरुपाचा स्पर्श केला ? | नाही. |
| ८. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, पिडीता ही अनुसुचित जातीची सदस्य आहे हे माहित असताना देखील आरोपीने पिडीते विरुध्द अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा, १९८९ मधील अनुसूचित विनिर्दीष्ट केलेला गुन्हा केला? | नाही. |
| ९. | काय आदेश ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ८ करिता –**

६. आरोपीवरील आरोप सिध्द करणेकामी अभियोग पक्षाने २ साक्षीदार, म्हणजेच पिडीता हिला नि.क्र.२५ व पिडीतेचे पती यांना नि.क्र.२९ अन्वये तपासले. पिडीता (नि.क्र.२५) व पिडीतेचे पती (नि.क्र.२९) यांनी आपल्या पुराव्यात अभियोगपक्षास सहकार्य न करता अभियोगपक्षाच्या

कथनाप्रमाणे घटना घडली नसल्याचे कथन केले. पिडीतेने (नि.क्र.२५) आपल्या पुराव्यात ती व तिचे पती आरोपीच्या पोल्ट्री फार्मवर कामावर जात असल्याचे परंतु आरोपीकडे १५ दिवस काम करुनही त्याने कामाची मजूरी दिली नसल्याचे व त्यामुळे त्यांनी ते काम सोडल्याचे सांगितले. तसेच पैशाच्या मागणीवरुन त्यांचेत व आरोपीत बाचाबाची होवून भांडण झाल्याचे कथन केले. त्याचप्रमाणे पिडीतेने (नि.क्र.२५) आपल्या पुराव्यात आरोपीने तिला धमकी दिल्याची, तिचा हात धरुन तिला ओढल्याची, इन्स्टाग्रामवर काढलेल्या फेक अकाउंटवर त्याने तिचे आंघोळ करत असतानाचे काढलेले फोटो व्हायरल करण्याची धमकी दिल्याची, तिचा विनयभंग केल्याचे व तिचेवर बलात्कार केल्याची घटना घडली नसल्याचे स्पष्टपणे कथन केले आहे. तसेच फिर्याद मधील मजकूर चुकीचा असल्याचे नमूद केले आहे.

७. पिडीतेचे पती (नि.क्र.२९) यांनी देखील पिडीता (नि.क्र.२५) हिने दिलेल्या साक्षीस दुजोरा देत पिडीतेबाबत फिर्याद (नि.क्र.२६) मध्ये नमूद केल्याप्रमाणे कुठलीही घटना घडली नसल्याचे कथन केले. सबब विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारांना उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारले. मात्र त्यातही आरोपीस त्याचे विरोधातील आरोपात गुंतवणारा व अभियोगपक्षाच्या कथनास पुरक असा कुठलाही पुरावा आलेला नाही. त्याचप्रमाणे पिडीतेचा भारतीय नागरीक सुरक्षा संहीता, २०२३ चे कलम १८३ प्रमाणे नोंदविलेला जबाब हा मुलभूत पुरावा होवू शकत नाही. त्यामुळे केवळ सदर जबाबाच्या आधारे आरोपीवरील आरोप सिध्द झाल्याचे म्हणता येणार नाही.

८.	प्रकरणातील महत्वाचे साक्षीदार म्हणजे पिडीता (नि.क्र.२५) व पिडीतेचे पती (नि.क्र.२९) यांनी अभियोगपक्षास आपल्या पुराव्यातून सहकार्य न केल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी इतर साक्षीदारांना प्रस्तुत प्रकरणामध्ये तपासलेले नसल्याचे दिसून येते. सबब, प्रस्तुत प्रकरणात आरोपीस त्याचे विरोधातील आरोपात गुंतवणारा व अभियोगपक्षाच्या कथनास पुरक असा कुठलाही पुरावा आलेला नसल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत आरोपीवरील आरोप सिध्द करण्यात अभियोगपक्ष सपशेल अपयशी ठरल्याचे माझे ठाम मत होते. सबब मुद्दा क्र.१ ते ८ यावर मी नकारार्थी निष्कर्ष नोदवित आहे.

**मुद्दा क्रमांक ९ करिता –**

९.	मुद्दा क्रमांक १ ते ८ यावर मी नकारार्थी निष्कर्ष नोंदविल्याने आरोपीस त्याच्या विरोधातील आरोपातून दोषमुक्त करणे क्रमप्राप्त होते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **विशाल उर्फ पोपट धनसिंग खामगळ** यास भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २५८(१) अन्वये भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ७४, ७८, ६४, ३५२, ३५१(२), ११५(२) तसेच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा, १९८९ कलम ३(२)(w)(i)(ii) व ३(२)(va) अन्वयेच्या शिक्षापात्र अपराधातून दोषमुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७ (अ) च्या पुर्ततेसाठी रक्कम रु.२५,०००/– चे बंधपत्र व तेवढयाच रकमेचा जातमुचलका सादर करावा.

३. फौजदारी नियमावली मधील प्रकरण ७ मधील परिच्छेद ७३(डी) अन्वये आजपासुन एका वर्षाचा कालावधी संपल्यानंतर गुन्हयातील जप्त मुद्देमाल एक व्हीवो कंपनीचा मोबाईल आरोपीस परत करण्यात यावा. दरम्यानच्या काळात मा. उच्च न्यायालयात अपिल दाखल झाल्याची सुचना प्राप्त झाल्यास सदरचा मुद्देमाल मा. उच्च न्यायालयातील सदर अपिलाच्या निर्णयाच्या तारखेपासुन एका वर्षाचा कालावधी संपेपर्यंत जतन करण्यात यावा.

४. आरोपीची इतर कुठल्याही गुन्हयात आवश्यकता नसल्यास त्यास तात्काळ तुरुंगातून मुक्त करण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by HETENDRA ANILKUMAR WANI
Date: 2026.07.28 17:33:46 +0530

(हितेंद्र उर्मिला अनिलकुमार वाणी)

दिनांक – २८.०७.२०२६

प्रभारी विशेष न्यायाधीश

(विशेष न्यायालय, न्यायालय क्र.३), बारामती